# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.07.2026** **वार:मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांच्या दौऱ्यावर
2. सहकार मंत्रालयाने गेल्या पाच वर्षांत सहकार क्षेत्राशी निगडित एकंदर 30 कोटी लोकांच्या जीवनात नवी ऊर्जा निर्माण केली-केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा
3. फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत स्पेन आणि बेल्जियमचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश आणि
4. महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत; देशाच्या अन्य भागातही जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**पंतप्रधान-मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांच्या दौऱ्यावर असून पहिल्या टप्प्यात काल इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं दाखल झाले. विमानतळावर इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी त्यांचं स्वागत केलं; इंडोनेशियाचे वरिष्ठ मंत्री, इंडोनेशियातील भारतीय राजदूत आणि भारतीय समुदायातील सदस्य यावेळी उपस्थित होते. भारत आणि इंडोनेशियाने 2018 मध्ये आपल्या संबंधांना 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी'च्या पातळीवर आणल आहे, त्याचा लाभ सर्वसामान्यांना होत आहे. असं मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. आज ते अनेक उच्च-स्तरीय बैठकांद्वारे उच्चपदस्थांशी आणि भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधतील. या चर्चांमध्ये व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सागरी सुरक्षा, डिजिटल तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यावर भर दिला जाण्याची अपेक्षा आहे.

**एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी काल बहारिनचे राजे हमद बिन ईसा अल खलीफा यांची भेट घेऊन दोन्ही देशांदरम्यानचे द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा केली. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, यावेळी त्यांनी बहारिनमध्ये राहणाऱ्या प्रवासी भारतीयांच्या योग्य सुरक्षेबाबत धन्यवाद दिले. एस जयशंकर सध्या 4 आखाती देशांच्या दौऱ्यावर असून कतार भेटीनंतर ते काल बहारिनमध्ये पोहचले. दौऱ्याच्या पुढच्या टप्प्यात ते कुवेत आणि ओमान या देशांना भेट देणार आहेत.

**अमित शहा**

सहकार मंत्रालयाने गेल्या पाच वर्षांत सहकार क्षेत्राशी निगडित एकंदर 30 कोटी लोकांच्या जीवनात नवी ऊर्जा निर्माण केली आहे. असं प्रतिपादन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी काल केलं. नवी दिल्ली इथं सहकार मंत्रालयाच्या पाचव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2021 मध्ये स्थापन केलेल्या या मंत्रालयाने सहकार क्षेत्रातील कार्यप्रणालीचे आधुनिक, पारदर्शक, तंत्रज्ञानावर आधारित आणि स्पर्धाक्षम अशा व्यवस्थेत रूपांतर केल आहे. मंत्रालयानं सहकार क्षेत्रापुढील प्रमुख आव्हाने ओळखली आहेत, त्यांच्या निवारणासाठी आणि क्षेत्राच्या विकासासाठी एक सर्वसमावेशक आराखडा तयार केला आहे, असंही ते यावेळी बोलताना म्हणाले. 30 क्षेत्रांमधील साडेआठ लाखांहून अधिक सहकारी संस्था आणि 32 कोटी सदस्यांची माहिती समाविष्ट करणारा एक एकात्मिक डिजिटल डेटाबेस तयार करण्यात आला आहे. तसंच राष्ट्रीय मानांकन प्रणालीची सुरुवात करण्यात आली आहे, याद्वारे प्रत्येक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल. असं मंत्रालयाच्या कामगिरीचा आढावा घेताना शहा यांनी सांगितलं.

**गोयल**

भारतातून जगातल्या अनेक देशात चामडे आणि चप्पल ची निर्यात साडेचार अब्ज डॉलर्स पर्यंत पोहचली आहे अशी माहिती केंद्रीय उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. नवी दिल्लीत काल चामडे निर्यात परिषदेत राष्ट्रीयस्तरावरील उत्कृष्ट निर्यात पुरस्कारांच वितरण गोयल यांच्या हस्ते झाल, त्यावेळी ते बोलत होते. गोयल म्हणाले की सध्या भारतातून या क्षेत्रात होत असलेली 77 टक्के निर्यात केवळ 15 देशांमध्येच केली जात आहे. जगातल्या 38 विकसित देशांनी मुक्त व्यापार कराराद्वारे आपली बाजारपेठ खुली केली असून, या देशांमध्ये चामडयापासून तयार करण्यात येणाऱ्या चपलांबरोबरच छोट्या मोठ्या पर्स, जॅकेट, कपडे, शोभेच्या वस्तू अशा विविध वस्तूंच्या निर्यातीसाठी मोठा वाव आहे.

**श्री-राम-जन्मभूमी**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाने सरचिटणीस चंपत राय आणि ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. राम मंदिर देणगीतील कथित गैरव्यवहार प्रकरणात त्यांची नावे समोर आल्यानंतर या दोघांनीही आपल्या पदांचा राजीनामा दिला होता. नवीन नियुक्ती होईपर्यंत कृष्ण मोहन यांची हंगामी सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
या प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. ट्रस्टने मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती करण्याचा निर्णयही घेण्यात आला असून, उमेदवारांची शिफारस करण्यासाठी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. न्यासाचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**निदर्शने POK**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये राजकीय तणाव वाढत असतानाच, 'जम्मू-काश्मीर जॉइंट आवामी ॲक्शन कमिटी' म्हणजे जे ए एसीनं पाकिस्तान सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी 48 तासांची मुदत दिली आहे. कथित नाकेबंदी संपवणे, दळणवळण सेवा पूर्ववत करणे, अन्न आणि औषधांचा अखंड पुरवठा, स्थानबद्ध नेत्यांची सुटका आणि 38-कलमी लेखी कराराची अंमलबजावणी अशा मागण्यांसाठी हजारो लोक रस्त्यावर उतरले आहेत. आपल्या मागण्या पूर्ण न झाल्यास 9 जुलै रोजी निर्णायक पाऊल उचलण्याचा इशारा या समितीनं दिला आहे. पाकिस्तानने दहशतवादविरोधी कायद्या अंतर्गत 'जेएएसी' वर बंदी घातल्यापासून या निदर्शनांनी अधिक जोर धरला आहे. 600 हून अधिक कार्यकर्ते आणि राजकीय नेत्यांना अटक करण्यात आल्याचा तसंच अन्नधान्य आणि अत्यावश्यक औषधांचा पुरवठा रोखून प्रशासनाने आर्थिक नाकेबंदी लागू केल्याचा आरोप या समितीनं केला आहे.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रिज इथं आज रात्री भारत आणि यजमान इंग्लंड यांच्यात 5 सामन्यांच्या मालिकेतला तिसरा टी-20 सामना होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री 10 वाजता सुरू होईल. दोन्ही संघांमधील पहिला सामना पावसामुळे अनिर्णित राहिला होता तर शनिवारी मँचेस्टर इथं झालेल्या दुसऱ्या टी-20 सामन्यात इंग्लंडने भारताचा 4 गडी राखून पराभव केला होता.

**फिफा**

फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत अमेरिकेतल्या डल्लास इथ काल 16 सामन्यांच्या श्रृंखलेत पोर्तुगालचा 1-0 ने पराभव करत स्पेनने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. स्पेनने 2010 मध्ये फिफा विश्वकरंडक जिंकला होता त्यानंतर पहिल्यांदा स्पेन उपान्त्य पूर्व फेरीत पोहचला आहे. तर काही वेळापूर्वी संपलेल्या तिसऱ्या सामन्यात बेल्जियमने अमेरिकेवर 3-4 ने विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**पाऊस**

महाराष्ट्रात मुंबई पुण्यासह ठाणे पालघर, रायगड आणि अन्य जिल्हयाना कालही मुसळधार पावसानं झोडपून काढलं. या पावसानं जनजीवन विस्कळीत झालं असून काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली आहे. पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यातील पाटण इथं घरावर दरड कोसळून 3 जणांचा मृत्यू झाला. राज्यात पावसामुळं झालेल्या दुर्घटनांमधे गेल्या तीन-चार दिवसात 13 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांनी काल विधान परिषदेत दिली. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. येत्या तीन दिवसांत अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. त्यामुळं सर्व शासकीय यंत्रणा 24 तास अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज गुजरात, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सागरी किनारी भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसच येत्या दोन दिवसांत दिल्ली, हरियाणा, चंडीगढ़, पंजाब, बिहार, छत्तीसगढ़, हिमाचल प्रदेश, सिक्किम, उत्तराखंड, मध्य प्रदेश, विदर्भ, आणि पश्चिम बंगालच्या किनारी भागात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे .

# याबरोबरच हे बातमीपत्र संपल ,

# नमस्कार